**ग्रामविकास विभागाचे शासनपत्र दिनांक २९.०९.२०२३ च्या पत्रामध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन दिनांक २८.०८.२०२३ रोजीपर्यंत संभाव्य निवड यादीवर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडुन प्राप्त झालेल्या आक्षेपांचे निराकरण करून तयार केलेली अनुपालन यादी**

दिनांक-

| अ. क्र | ग्रा.पं. व पं.स.चे नांव | कर्मचाऱ्याचे नांव व सादर केलेल्या आक्षेप अर्जाचा दि. | आक्षेप | आक्षेपाची पुर्तता बाबत अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | भटरा ता.कुही | श्री.दिलीप शामराव मोहनकर 28.08.2023 | ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामधुन १० % निवड यादी सन-२०२३ करीता संभाव्य निवड यादी प्रसिध्द नंतर उमेदवारांकडुन प्राप्त झालेल्या आक्षेपांचे निराकरण करून सुधारित निवड यादी प्रसिध्द करण्यात आली.सुधारित निवड यादी नंतर माझे नांव अ.क्र.३९ वर त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामधुन १० % पदभरती करीता उपलब्ध असलेल्या पदांकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हतेनुसार मला अपात्र ठरविले आहे. | सन-२०२३ च्या अंतिम यादी नुसार श्री.जयपाल वासनिक यांचा सेवा जेष्ठता क्रमांक हा श्री.दिलीप शामराव मोहनकर यांचे पुर्वी असल्याने सुधारित यादी मध्ये श्री.वासनिक यांची शैक्षणिक अर्हता इ.१० वी विज्ञान विषय घेऊन उत्तीर्ण असल्याने त्यांना आरोग्य सेवक पुरूष या पदाकरीता पात्र करण्यात आले परंतु सन-२०२३ च्या अंतिम यादीवरून श्री.जयपाल वासनिक यांचा जन्म दिनांक २०/१०/१९८२ व नियुक्ती दिनांक ३०/१०/१९९९ पडताळणी केली असता वय १७ वर्ष १० दिवस म्हणजे १८ वर्ष पुर्ण न झालेने ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे पत्र दि.०२ डिसेंबर २००५ च्या परिपत्रकानुसार सन-२०२३ च्या पद भरती करीता अपात्र ठरत असल्याने श्री.दिलीप शामराव मोहनकर यांना आरोग्य सेवक पुरूष या पदाकरीता विचाराधिन ठेवण्यात आलेले आहे.त्यामुळे निवड समितीदवारे आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 2 | वासी ता.भिवापूर | श्री.दिनेश सुर्यभान मानकर 28.08.2023 | दि.२१/०८/२०२३ ला प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा जेष्ठता यादी मधुन २४ ग्राम पंचायत कर्मचारी यांनी विचाराधिन केलेले आहे.पात्र करण्यात आलेले कर्मचारी यांना कोणत्या कॅटेगेरी नुसार पात्र करण्यात आले व शैक्षणिक पात्रतेनुसार किंवा सेवा जेष्ठतेनुसार पात्र करण्यात आले. | दि.२१/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचारी यांची निवड ही दि.०२ जुन २०२३ च्या ग्राम विकास विभागाचे शासन पत्रानुसार तसेच सेवा जेष्ठतेनुसार व राखीव ठेवण्यात आलेल्या पदांकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठतेनुसार विचाराधिन ठेवण्यात आलेली आहे. आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 3 | बांद्रा ता.रामटेक | श्री.पांडुरंग महाग्या मसराम 28.08.2023 | दि.२१/०८/२०२३ ला प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा जेष्ठता यादी नुसार संभाव्य यादीमध्ये माझे नांव अ.क्र.५६ वर होते परंतु आता माझे नांव अ.क्र.६० वर आलेले आहे.परंतु सुधारीत यादी मध्ये एकुण १८ ग्रा.कर्मचाऱ्यांची नांवे नोंदविण्यात आलेली आहे.अगोदर च्या यादीत नांव नसतांना आता त्यांचे नांवे हि त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.माझी शैक्षणिक अर्हता व जातीची वर्गवारी यांचा विचार करून मला पदोन्नती देण्यात यावी.व ज्यांची नांवे नव्याने घेण्यात आली त्यांची प्रत्यक्ष तपासणी करून सर्वांना त्यांच्या योग्यतेनुसार पदोन्नती देण्यात यावी. | दि.२१/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचारी यांची निवड हि दि.०२ जुन २०२३ च्या ग्राम विकास विभागाचे शासन पत्रानुसार तसेच सेवा जेष्ठतेनुसार व राखीव ठेवण्यात आलेल्या पदांकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठतेनुसार विचाराधिन ठेवण्यात आलेली आहे. शैक्षणिक अर्हता बी.कॉम प्रथम वर्ष उत्तीर्ण दि.०१/०७/२०२३ ची असल्याने ग्रामविकास विभागाचे शासनपत्र दिनांक 21.09.2023 अन्वये सन-२०२३ ची अंतिम यादी दि.०८/०५/२०२३ ला प्रसिध्द करण्यात आल्यामुळे त्यावेळेस धारण करीत असलेली शैक्षणिक अर्हता ही इयत्ता १० वी अनुत्तीर्ण असल्याने त्यांचे नांव पदभरती २०२३ करीता विचाराधिन ठेवण्यात आलेले नाही.तरी आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | डेगमा (खु.) ता.हिंगणा | श्री.विलास महादेव कोहळे २५/०८/२०२३ | दि.२१/०८/२०२३ ला प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा जेष्ठता यादी नुसार संभाव्य यादीमध्ये माझे नांव अ.क्र.३१ वर असुन मी कंत्राटी ग्रामसेवक पदाकरीता पात्र असुन माझी शैक्षणिक अर्हता बी.ए.पास/कृषी पदविका/MS-CIT / पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय पदविका प्रमाणपत्र असुन मला कंत्राटी ग्रामसेवक पदाकरीता पात्र करण्यात यावे. | दि.२१/०८/२०२३ ला प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा जेष्ठता यादी नुसार संभाव्य यादीनुसार निवड समितीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे सेवा जेष्ठता यादीनुसार व दिनांक ०२ जुन २०२३ च्या ग्राम विकास विभागाचे शासन पत्रानुसार निवड यादी तयार करण्यात आलेली आहे.तसेच उमेदवारांची शैक्षणिक अर्हता / वेतनस्तर याचा विचार करून निवड यादी तयार करण्यात आली. शैक्षणिक अर्हतेमध्ये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय प्रमाणपत्र प्राप्त केल्याने सेवा जेष्ठता क्रमांकानुसार पशुधन पर्यवेक्षक या पदाकरीता विचाराधीन ठेवण्यात आलेले आहे.तरी आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 5 | सालेशहरी( सालेभट्टी पूर्न), भिवापूर | श्री. राजकुमार श्रावणकुमार भोयर 28.08.2023 | दि.२४/०८/२०२३ रोजी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधुन १०% निवड यादी सन-२०२३ करीता संभाव्य निवड यादी प्रसिध्द नंतर उमेदवारांकडुन प्राप्त झालेल्या आक्षेपांची निराकरण करून निवडी करीता ग्रामपंचायत१०% पदभरती करीता कर्मचाऱ्यांची सुधारीत निवड यादी तयार करण्यात आलेली असुन त्यामध्ये माझे नांव अ.क्र.७८वर असुन शैक्षणिक अर्हतानुसार वर्ग-३ चे पद उपलब्ध नाही असे दर्शविले आहे.यामुळे माझ्यावर जिल्हा परिषद कडुन होत असलेला अन्याय आहे.या अगोदर माझे शेत जमीन घर इत्यादी गोसी खुर्द मध्ये सन-१९९७ / १९९८ या वर्षात भुसंपादीत करण्यात आले आहे.त्यामुळे माझ्या कुटुंबावर अन्याय झालेला आहे.तसेच शासनाने आम्हाला कोणत्याही शासकीय नोकरीत सामावुन घेतेले नाही व पुवर्सन लोकांसाठी ग्रामपंचायत सेवेत राहुन त्यांचेसाठी व प्रशासनासाठी कार्य केले तथा सहकार्य केले परंतु शासन व जिल्हा परिषद कडुन माझ्यावर निरंतर अन्याय होत आहे.ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधुन १०% जिल्हा परिषद सेवेत नियुक्ती करीता शेवट ची संधी आहे.कारणआज माझे वय४६वर्ष पुर्ण झालेले आहे. | श्री.राजकुमार श्रावणकुमार भोयर यांचे नांव सन-२०२३ च्या सेवा जेष्ठता यादी मध्ये अ.क्र.७२ वर असुन यांचे क्रमांकापर्यत आरोग्य सेवक (पु.) व कंत्राटी ग्रामसेवक पदे ही पदे संपुष्टात आलेली असल्यामुळे त्यांना या पदाकरीता विचाराधिन ठेवण्यात आलेले नाही.सरळसेवा पदभरती 2023 च्या जाहिरातीनुसार पदाला आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम -१९६७ मधील तरतुदी नुसार कनिष्ठ सहाय्यक लिपिक/ लेखा या पदाकरीता व्यावसायीक अर्हता टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि.आवश्यक असल्याने व्यावसायिक अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना कनिष्ठ सहाय्यक लिपिक/ लेखा या पदाकरीता पात्र करण्यात आलेले नाही.सा.प्र.वि.विभाग शा.निर्णय क्र.संकिर्ण १११४/प्र.क्र.२००/१६अ दिनांक ०४.०९.२०१५ प्रकल्पग्रस्ताकरीता लागु करणेबाबत ग्रा.वि.विभाग,महाराष्ट्र शासन मुंबई यांची शासन अधिसुचना विपीएम २००४/ प्र.क्र.२६१ /परा-५दिनांक १९.०८.२००५ तसेच वेळोवेळी निर्गमीत झालेले शासन पत्र/परिपत्रक शासन निर्णय यामध्ये प्रकल्पग्रस्त यांचेकरिता ग्रामपंचायत 10%पदभरती करणेकरिता लागु करणेबाबत उल्लेख केलेला नाही. श्री.भोयर हे ग्राम पंचायत मध्ये कार्यरत कर्मचारी असल्याने प्रकल्प ग्रस्त असल्याबाबतचा दावा हा ग्रामपंचातय कर्मचाऱ्यांमधुन 10% पद भरती करीता लागु करता येत नाही. तरी आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 6 | म्हसली ता.कुही | श्री.भिवुतराव भगवान भोयर 28.08.2023 | ग्रामपंचायत कर्मचारी १० % निवड यादी सन-२०२३ मध्ये माझे नावं अ.क्र.१७ वर कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन निवड करण्यात आली आहे परंतु मला ग्रामसेवक ऐवजी आरोग्य सेवक या पदाकरीता विचाराधीन करण्यात यावे. | ग्रामपंचायत कर्मचारी १० % निवड यादी सन-२०२३ मध्ये श्री.भोयर यांचे नावं अ.क्र.१७ वर असुन त्यांची शैक्षणिक अर्हता इ.१२ वी उत्तीर्ण व व्यावसायिक अर्हता MS-CIT चे प्रमाणपत्र उत्तीर्ण असल्याने त्यांचे सेवा जेष्ठता क्रमांकानुसार कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरीता विचाराधिन ठेवण्यात आले असल्यामुळे त्यांचा आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | खुमारी ता.रामटेक | श्री.विनोद धनराज सायरे 28.08.2023 | सन-2023 च्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सेवा जेष्ठता यादीनुसार माझा क्रमांक १३० वर असुन निवड समितीच्या यादीमध्ये माझे नांव समाविष्ठ केलेले नाही करीता आपण माझे नांव ग्राम पंचायत कर्मचारी निवड समितीच्या सेवा जेष्ठता यादीमध्ये समाविष्ठ करावे हि विनंती. | सन-२०२३ च्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सेवा जेष्ठता यादीनुसार क्रमांक १३० वर असुन ग्रामपंचायत कर्मचारी १० % पदभरती सन-२०२३ हि दि.०२/०६/२०२३ चे ग्राम विकास विभागाचे शासन पत्रानुसार करण्यात आलेली असुन सन-२०२३ च्या अंतिम यादीमध्ये त्यांचे नांव अ.क्र.१३४ वर असुन विचाराधिन असलेले ग्राम पंचायत कर्मचारी अ.क्र.१२१ पर्यत विचाराधिन ठेवण्यात आले असल्याने अ.क्र. १२२ ते अ.क्र. १७७ अखेर पर्यंत ग्राम पंचायत कर्मचारी यांचे नांवे संभाव्य यादी मध्ये समाविष्ठ करण्यात आलेले नसल्यामुळे आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 8 | चिचोली ता.नागपूर | श्री.सचिन अशोक राऊत 28.08.2023 | दि.21.08.2023 सभेच्या कार्यवृत्त अहवालानुसार माझी नियुक्ती हि रद्द करण्यात आली असुन माझे ऐवजी अ.क्र.४१ वर सुधारीत यादीनुसार श्री.संदीप सुधाकर बोंदाडे यांची निवड स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर करण्यात आलेली आहे.परंतु त्यांची निवड दि.११/०७/२०२३ च्या यादीनुसार कनिष्ठ सहाय्यक या पदावर अ.क्र.३८ नुसार करण्यात आलेली होती त्यानुसार त्यांनी दि.३१/०७/२०२३ ला मला कनिष्ठ सहाय्यक लिपिक चे पद मला मान्य असुन मी करण्यास तयार आहे.अश्या प्रकारची लिखीत स्वरूपात आपल्या कार्यालयाला कळविले असुन त्यानुसार त्यांची निवड हि कनिष्ठ सहाय्यक हे पद कायम ठेऊन मला माझ्या मिळालेल्या जागेचा प्रवर्ग लक्षात घेता मला माझी निवड हि वि.मा.प्र. हा प्रवर्ग कायम ठेऊन मला स्थापत्य अभियांत्रिकी पद कायम ठेवण्यात यावे हि विनंती. | श्री.सचिन अशोक राऊत यांची दि.११.०७.२०२३ला प्रसिध्द करण्यात आलेल्या संभाव्य यादीमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाकरीता विचाराधिन करण्यात आले होते.परंतु श्री.संदिप सुधाकर बोंदाडे यांनी दि.२०.०७.२०२३ रोजी कार्यालयास केलेल्या अर्जानुसार त्यांनी त्यांची शैक्षणिक अर्हता Contruction Surpervisor Diploma चे प्रमाणपत्र असल्यामुळे मला स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाकरीता विचाराधिन करण्यात यावे असा अर्ज केल्यामुळे त्यांना सेवा जेष्ठतेनुसार स्थापत्य अभियांत्रिकी या पदाकरीता विचाराधिन ठेवण्यात आले होते तथापि, ग्रामविकास विभागाचे पत्र दिनांक 21.09.2023 अन्वये श्री.संदिप सुधाकर बोंदाडे यांची शैक्षणिक अर्हता Contruction Surpervisor Diploma उतीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र दि.31.12.2022 नंतरचे म्हणजेच दि. 02/03/2023 चे आहे त्यामुळे श्री.सचिन अशोक राऊत यांचा आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 9 | टाकळघाट ता.हिंगणा | श्री. मयंक प्रकाशराव डफरे 28.08.2023 | ग्रामपंचायत कर्मचारी १०% पदभरती सन-२०२३ नुसार माझा अ.क्र.१६१ वर समाविष्ट माझी शैक्षणिक अर्हता इ.१२ वी उत्तीर्ण / Diploma in Civil Engineering/ B.A.Final/ ITI/ Contrucstion Supervior/ Typing Eng-30/40/Typing Marathi-30 वरील शैक्षणिक अर्हतेनुसार मला कनिष्ठ अभियंता या पदावर १० % ग्रामपंचायत कर्मचारी मधुन नियुक्ती देण्यात यावी हि विनंती. | श्री. मयंक प्रकाशराव डफरे यांचे दि.28/08/२०२३ च्या अर्जानुसार त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या मुळ दस्ताऐवजाची पडताळणी केली असता Diploma in Civil Engineering हि पदवी Janardhan Rai Nagar Rajasthan Vidyapeeth University (Deemed to be) Udaipur (Rajasthan ) या विद्यापिठाची असुन मुळ गुण पत्रिकाची पडताळणी केली असता त्यामध्ये एकुण ४०००० पैकी २७८४ एवढे गुण मिळाल्याचे दिसुन आले आहे.म्हणजेच यावरून श्री.डफरे यांनी कार्यालयास सादर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | केलेल्या गुणपत्रिकामध्ये उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण आहे किंवा कसे असा बोध होत नाही. पंचायत विभाग जिल्हा परिषद नागपूर येथे सन 2023 ची ग्रामपंचायत कर्मचा-यांची अंतिम सेवाजेष्ठता यादी दि.08.05.2023 रोजी प्रसिध्द करण्यात आली. परंतु श्री.डफरे यांनी Diploma in Civil Engineering या पदविका प्रमाणपत्र उतीर्ण वर्ष -2013 ला प्राप्त झाल्यानंतरही त्यांनी कार्यालयामध्ये दस्ताऐवज सादर केले नाही त्यामुळे सन 2023 ची ग्रामपंचायत कर्मचा-यांची अंतिम सेवाजेष्ठता यादीमध्ये नोंद घेण्यात आली नाही. श्री.डफरे यांच्या अर्जान्वये सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद नागपूर कार्यालयाचे पत्र क्रमांक/साप्रवि/जिपना/ग्रा.पं पदभरती/आस्था-3(3)/2679/2023 दिनांक 12 ऑक्टोबर 2023 अन्वये श्री. मयंक प्रकाशराव डफरे यांना मुळ दस्तावेज पडताळणी करिता बोलविण्यात आले परंतु अदयापपर्यंत मुळ दस्ताऐवज पडताळणीस उपस्थित झाले नसल्यामुळे आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |

**(विपुल जाधव)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),**
**जिल्हा परिषद,नागपूर**

**(सौम्या शर्मा,** भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,नागपूर**